RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ११, अंक ३७] शुक्रवार, ऑक्टोबर ३, २०२५/आश्विन ११, शके १९४७ [पृष्ठे १९, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ६९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५.

**अधिसूचना**

**कारखाना अधिनियम, १९४८.**

क्रमांक एफएसी २०२५/प्र.क्र ११७(भाग-२)/कामगार-४.—कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ४१ तसेच ११२ व ११५ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ११५ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेः—

**१.** या नियमांस, महाराष्ट्र कारखाने (दुसरी सुधारणा) नियम, २०२५, असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम ३ मध्ये,-

(१) पोट-नियम (१) मधील,-

(अ) "नमुना १ मध्ये करण्यात येईल" या मजकुराऐवजी,"नमुना १ मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्यात येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (ब) मधील, "दोन प्रतीतील" हा मजकूर वगळण्यात येईल;

(२) पोट-नियम (२) मधील, "ची एक प्रत" हा मजकूर वगळण्यात येईल;

(३) पोट-नियम (३) मधील,-

(अ) "नमुना १ मध्ये करण्यात येईल" या मजकुराऐवजी,"नमुना १ मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्यात येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (ब) मधील, "दोन प्रतीतील" हा मजकूर वगळण्यात येईल;

(४) पोट-नियम (४) मधील, "ची एक प्रत" हा मजकूर वगळण्यात येईल.

**३.** मुख्य नियमांच्या नियम ३-अ मध्ये,-

(१) पोट-नियम (१) मधील,-

(अ) "त्याच्याकडून मान्यता देण्यात येईपर्यंत" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ब) स्पष्टीकरण (१) वगळण्यात येईल;

(२) पोट-नियम (२) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईलः-

"(२) जोखीमकारक कारखान्याव्यतिरिक्त अन्य कारखान्यांच्या बाबतीत, भोगवटादार, कारखान्याच्या बाबतीत नियम ६अ अन्वये परवाना दिल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत, कारखाना म्हणून किंवा कारखान्याचा भाग म्हणून वापरात असलेल्या कोणत्याही जागेसाठी बांधण्यात आलेल्या, पुनर्बांधकाम करण्यात आलेल्या किंवा विस्तारित करण्यात आलेल्या इमारतीच्या बाबतीत, सक्षम व्यक्तीने दिलेले नमुना-१अ मधील स्थिरता प्रमाणपत्र कारखान्याच्या मुख्य निरीक्षकास सादर करील.".

**४.** मुख्य नियमांच्या नियम ५ मध्ये,-

(१) पोट-नियम (१) मधील, "तीन प्रतीतील" हा मजकूर वगळण्यात येईल;

(२) पोट-नियम (२) मधील,-

(अ) "२०१३" ऐवजी "२०२६" हा अंक दाखल करण्यात येईल;

(ब) "अनुसूची अ" व "अनुसूची ब" या ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईलः-

## अनुसूची "अ"

"सर्व कारखान्यातील (वीज निर्मिती केंद्र वगळून) वर्षांतील कोणत्याही एका दिवशी कामावर लावण्यात यावयाच्या व्यक्तींची संख्या"

| स्थापित अश्वशक्तीचे प्रमाण (कमाल अश्वशक्ती) | कामगार संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९ पर्यंत | २० ते ५० | ५१ ते १५० | १५१ ते २५० | २५१ ते ५०० | ५०१ ते १००० | १००१ ते २५०० | २५०१ ते ४००० | ४००० पेक्षा अधिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| निरंक | ३८५ | ८२५ | ३८५० | ५७७५ | ११५५० | २३१०० | ४६२०० | ६९३०० | ९२४०० |
| १० पर्यंत | ७७० | २४७५ | ७७०० | ११५५० | १७३२५ | ३४६५० | ६९३०० | ९२४०० | ११५५०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० पेक्षा अधिक परंतु ५० पर्यंत | ११५५ | ४१२५ | ११५५० | १७३२५ | २३१०० | ४६२०० | ८६६२५ | १०५८७५ | १२७०५० |
| ५० पेक्षा अधिक परंतु १०० पर्यंत | ३०८० | ५७७५ | १७३२५ | २३१०० | ३४६५० | ५७७५० | १०३९५० | ११५५०० | १३८६०० |
| १०० पेक्षा अधिक परंतु ५०० पर्यंत | ६९३० | ११५५० | ३४६५० | ४६२०० | ५७७५० | ८६६२५ | ११५५०० | १३८६०० | १६१७०० |
| ५०० पेक्षा अधिक परंतु १००० पर्यंत | १३४७५ | २४७५० | ४६२०० | ६३५२५ | ७५०७५ | ११५५०० | १३८६०० | १६१७०० | १८४८०० |
| १००० पेक्षा अधिक परंतु २००० पर्यंत | १९२५० | ३१३५० | ६३५२५ | ७५०७५ | ९२४०० | १२७०५० | १६१७०० | १८४८०० | २०७९०० |
| २००० पेक्षा अधिक | २६९५० | ५४४५० | ७५०७५ | ९२४०० | १२७०५० | १६१७०० | १८४८०० | २०७९०० | २३१००० |

## अनुसूची "ब"
## वीज निर्मिती केंद्रे

| मेगा वॅटमधील सर्वसाधारण क्षमता | कामगार संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | १०० पर्यंत | १०१ ते ५०० | ५०१ ते १००० | १००० पेक्षा अधिक |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| २० मेगावॅट पर्यंत | ४६२० | ६९३० | ११५५० | १७३२५ |
| २० मेगावॅट पेक्षा अधिक व ५० मेगावॅट पर्यंत | ६५४५ | १०३९५ | १७३२५ | २३१०० |
| ५० मेगावॅट पेक्षा अधिक व १०० मेगावॅट पर्यंत | ९६२५ | १३४७५ | २३१०० | २८८७५ |
| १०० मेगावॅट पेक्षा अधिक व २५० मेगावॅट पर्यंत | १३४७५ | १७३२५ | २८८७५ | ३४६५० |
| २५० मेगावॅट पेक्षा अधिक व ५०० मेगावॅट पर्यंत | १७३२५ | २८८७५ | ३४६५० | ४०४२५ |
| ५०० मेगावॅट पेक्षा अधिक व ७५० मेगावॅट पर्यंत | २६९५० | २८८७५ | ४२५७० | ४६२०० |
| ७५० मेगावॅट पेक्षा अधिक व १००० मेगावॅट पर्यंत | २६९५० | ३४६५० | ४६२०० | ५७७५० |
| १००० मेगावॅट पेक्षा अधिक | ३०८०० | ३४६५० | ५७७५० | ६९३०० |

(३) पोट-नियम (३) मधील, "२०१३" या अंकाऐवजी "२०२६" हा अंक दाखल करण्यात येईल;

(४) पोट-नियम (४) वगळण्यात येईल.

**५.** मुख्य नियमांच्या नियम ६ मध्ये, पोट-नियम (१) मधील, "नमुना ४ मधील परवाना" या मजकुराऐवजी, "नमुना ४ मधील इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील परवाना" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**६.** मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये, पोट-नियम (२) मधील, "त्याचे नूतनीकरण करू शकेल" या मजकुराऐवजी, "नमुना ४ मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्याचे नूतनीकरण करू शकेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य नियमाचा नियम ११ वगळण्यात येईल.

**८.** मुख्य नियमांच्या नियम १४ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः-

"**१४. भोगवट्याची सूचना.–** आधारभूत दस्तऐवजांसह भोगवट्याची सूचना, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात नमुना १ मध्ये सादर करण्यात येईल. उपमुख्य निरीक्षक, सूचना स्वीकारल्यानंतर, पूर्वी दिलेल्या परवान्याच्या उर्वरित कालावधीसाठी भोगवटादाराच्या नावाने इलेक्ट्रॉनिक स्वरूपात परवाना देईल.".

**९.** मुख्य नियमांच्या नियम १५ मधील, "नमुना ५ मध्ये" या मजकुराऐवजी, "इलेक्ट्रॉनिक स्वरूपात नमुना १ मध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१०.** मुख्य नियमांच्या नियम १८-अ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः-

"**१८-अ. कामगारांची वैद्यकीय तपासणी.–**

(१) प्रत्येक भोगवटादार, नियम ७३-व्ही आणि ११४ अन्वये समाविष्ट असलेल्या कामगारांव्यतिरिक्त, ज्या कामगारांनी वयाची पंचेचाळीस वर्षे पूर्ण केलेली आहेत, प्रत्येक कामगाराची, दरवर्षी मोफत वैद्यकीय तपासणी करण्याची व्यवस्था करील;

(२) कलम १० अन्वये शासनाने नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या अर्हतापात्र वैद्यकीय व्यवसायीकडून किंवा प्रमाणित शल्यचिकित्सकाकडून अथवा अर्हतापात्र वैद्यकीय व्यवसायींच्या संस्थेद्वारे किंवा राज्य कामगार विमा महामंडळ यांचे वैद्यकीय अधिकारी किंवा राज्य कामगार विमा सोसायटी यांचे वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय तपासणी करण्यात येईल;

**स्पष्टीकरण.–** "अर्हतापात्र वैद्यकीय व्यवसायींची संस्था" याचा अर्थ, किमान पाच अर्हतापात्र वैद्यकीय व्यवसायींचा गट असलेली संस्था, असा आहे.

(३) भोगवटादार, वैद्यकीय तपासणीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत मुख्य निरीक्षकास इलेक्ट्रॉनिक स्वरूपात नमुना ७-अ पाठवील.".

**११.** मुख्य नियमांच्या नियम ७३-डब्ल्यू मध्ये,-

(१) पोट-नियम (१) मधील,-

(अ) खंड (अ) मधील, "५०" या मजकुराऐवजी, "१५०" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (ब) मधील, "५१ ते २००" या मजकुराऐवजी,"१५१ ते ५००" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(क) खंड (क) मधील,-

(एक) "२००" या मजकुराऐवजी, "५००" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) उपखंड (एक) मधील, "५००" या मजकुराऐवजी, "१०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-नियम (२) मधील, "राज्य शासनाने मान्यता दिलेल्या किमान तीन महिन्यांच्या कालावधीचे औद्योगिक आरोग्य यामधील प्रशिक्षणाचे" या मजकुरानंतर, "किंवा औद्योगिक कामगारांची वैद्यकीय तपासणी करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव असल्याचे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**१२.** मुख्य नियमांच्या नियम ७३ झेड क नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईलः "**७३-झेड ड. अभिरूप सराव (मॉक ड्रिल).-**

(१) प्रत्येक कारखान्याचा भोगवटादार, कारखान्यातील धोक्यामुळे उद्‌भवणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितींवर आधारित असलेला अभिरूप सराव (मॉक ड्रिल) सहा महिन्यांतून किमान एकदा करवून घेईल.

(२) अभिरुप सरावांचे दिनांक व परिस्थिती, अभिरूप सराव केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत निरीक्षकास कळविण्यात येईल.".

**१३.** मुख्य नियमांच्या नियम ७९ मधील, पोट-नियम (१) चे परंतुक वगळण्यात येईल.

**१४.** मुख्य नियमांच्या नियम १०२-ब ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः-

"**१०२-ब.- संध्याकाळी ७.०० ते सकाळी ६.०० या वेळेत कारखान्यात काम करणाऱ्या महिला कामगारांना पुरवावयाची सुरक्षितता, सुरक्षा उपाययोजना व सुरक्षा उपाय.-** भोगवटादार, कारखान्यातील महिला कामगारांसाठी सकाळी ६.०० पूर्वी आणि संध्याकाळी ७.०० नंतर, पुढील शर्तींची खात्री करीलः-

(अ) महिला कामगारांना त्यांच्या निवासस्थानातून कारखान्यात घेऊन जाण्यासाठी आणि पुन्हा घरी सोडण्यासाठी पुरेशा वाहतुकीच्या सुविधा पुरविण्यात येतील.

(ब) शौचालये, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, कपडे बदलण्याची खोली, महिला कामगारांच्या प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या सोयी व सुविधांसह कामाचे ठिकाण, चांगले प्रकाशमान असेल.

(क) कोणत्याही कामाच्या ठिकाणी किमान दोन महिला कामगार कर्तव्यावर उपस्थित राहतील.

(ड) रात्र पाळीमध्ये व नियमित पाळीमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांना, दर आठ आठवड्यातून एकदा तक्रार दिन म्हणून त्यांच्या प्रतिनिधींमार्फत व्यवस्थापकाबरोबर बैठक घेता येईल आणि व्यवस्थापक, तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न करील.

(इ) अशा कामासाठी व अशा कालावधीसाठी प्रत्येक महिला कामगाराची लेखी संमती घेण्यात येईल आणि ती तीन वर्षांसाठी जतन करण्यात येईल.

(फ) किमान पंचेचाळीस दिवसांची रेकॉर्डिंगची सुविधा असलेली सीसीटीव्ही संननिरीक्षण यंत्रणा बसवण्यासह, महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी व सुरक्षिततेसाठी सर्व व्यवहार्य उपाययोजना केल्याची सुनिश्चित करण्यात येईल".

**१५.** मुख्य नियमाचा नियम १०२- क वगळण्यात येईल.

**१६.** मुख्य नियमांच्या नियम ११४ मध्ये,-

(१) अनुसूची दोन मधील, खंड (३) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) अनुसूची तीन मधील, खंड (३) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(३) अनुसूची चार मधील, खंड (४) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(४) अनुसूची सहा मधील, खंड (४) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(५) अनुसूची सात मधील, खंड (१) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(६) अनुसूची आठ मधील, खंड (१०) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर

दाखल करण्यात येईल.

(७) अनुसूची दहा मधील, खंड (२) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(८) अनुसूची तेरा वगळण्यात येईल;

(९) अनुसूची चौदा मधील, खंड (२) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(१०) अनुसूची पंधरा मधील, खंड (४) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(११) अनुसूची अठरा मधील, खंड (९) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(१२) अनुसूची वीस मधील, खंड (६) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(१३) अनुसूची एकवीस मधील, खंड (१६) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(१४) अनुसूची बावीस मधील, खंड (९) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(१५) अनुसूची सव्वीस मधील, खंड (९) मध्ये, "महिला" या मजकुराऐवजी, "गरोदर महिला, स्तन्यदा माता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१७.** मुख्य नियमांच्या नियम ११४-अ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईलः-

**"११४-अ. कलम ८७ खालील धोकादायक कामांमध्ये महिलांना कामावर ठेवण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना.-**

(१) ज्या उत्पादन प्रक्रियेत धूळ, धूर किंवा इतर अशुद्ध पदार्थ सोडले जातात, त्या उत्पादन प्रक्रियेत काम करणाऱ्या प्रत्येक महिलेला, योग्य श्वसन यंत्र, नाकाचा मास्क, इत्यादी पुरवण्यात येतील.

(२) कोणत्याही फिरत्या भागामुळे शारीरिक दुखापत होण्याचा धोका टाळता यावा म्हणून, डोक्यावर टोपी, एप्रन व योग्य ओव्हरकोट घातल्याशिवाय, कोणत्याही महिला कामगाराला फिरत्या यंत्राजवळ काम करण्यास लावले जाणार नाही.

(३) धोकादायक कार्ये करणारा भोगवटादार, संपर्क, हाताळणी, वाहतूक, साठवणूक व इतर प्रक्रियांमुळे उद्‌भवणारे धोके, शारीरिक व आरोग्य विषयक धोके याबद्दलची माहिती, प्रत्येक महिला कामगाराकडे प्रसारित करील आणि अशी माहिती, मराठीत आणि प्रत्येक महिला कामगाराला समजेल अशा भाषेत असेल.

(४) कोणत्याही गरोदर किंवा स्तन्यदान महिला कामगाराला, जिथे ती कर्करोगजन्य आणि अपरूपजनक (टेराटोजेनिक) घातक पदार्थांच्या संपर्कात येण्याचा संभव आहे अशा धोकादायक कार्यांमध्ये सहभागी असलेल्या कारखान्यात काम करण्याची परवानगी दिली जाणार नाही किंवा काम करण्यास भाग पाडले जाणार नाही.

(५) महिलांना त्यांच्या कामाचे चांगले प्रशिक्षण देण्यात येईल आणि हाताळल्या जाणाऱ्या, साठवल्या जाणाऱ्या, उत्पादित केल्या जाणाऱ्या पदार्थांच्या घातक गुणधर्मांबद्दल, त्यांच्या कामाच्या ठिकाणी असलेल्या धोक्यांबद्दल आणि त्यावर मात करण्याच्या उपाययोजनांबद्दल ज्ञान देण्यात येईल.

(६) कामावर असलेल्या महिलांना, जेथे तैनात केलेले आहेत त्या कामाच्या ठिकाणी, आवश्यक असलेली सर्व वैयक्तिक संरक्षक उपकरणे पुरवण्यात येतील.

(७) महिलांना आग, धोकादायक पदार्थांची गळती व सांडणे या प्रसंगी, सुटका करण्याच्या मार्गाविषयी प्रशिक्षित करण्यात येईल आणि जागरूक करण्यात येईल.

(८) महिलांना मासिक पाळी, प्रजनन आरोग्य किंवा गर्भधारणेवर परिणाम करू शकणाऱ्या किंवा प्रभावित करू शकणाऱ्या कोणत्याही पदार्थांच्या संपर्कात येऊ दिले जाणार नाही याची भोगावटादार खात्री करील.".

**१८.** मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना- १ ऐवजी, पुढील नमुना दाखल करण्यात येईलः-

**"नमुना- १**

(नियम ३,५,८,१४ व १५ पहा)

**नवीन कारखाना बांधण्यासाठी, विद्यमान कारखान्याचा विस्तार करण्यासाठी किंवा कोणत्याही इमारतीचा कारखाना म्हणून वापर करण्यासाठी परवानगीसाठी अर्ज/नोंदणीसाठी आणि परवाना मंजूर करण्यासाठी/ परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी/कारखान्याच्या परवान्यात सुधारणा करण्यासाठी अर्ज/व्यवसायाची सूचना/व्यवस्थापक बदलाची सूचना.**

( *लागू असेल तेथे ✓ करा)

| | | |
|---|---|---|
| १. | कारखान्याचे पूर्ण नाव | |
| | कारखान्याचा पत्ता | |
| | कारखान्याचे स्थान (अक्षांश ० उत्तर आणि रेखांश ० पूर्व) | |
| | दूरध्वनी क्रमांक | |
| | ई-मेल पत्ता, नोंदणीकृत कार्यालय (कोणतेही असल्यास) | |
| | ई-मेल- कारखाना | |
| २. | जर आधीच नोंदणी केलेली असेल तर, नोंदणीचा महिना व वर्ष | |
| ३. | जर परवाना दिलेला असेल तर, परवाना क्रमांक. | |
| ४. | मुख्य निरीक्षकांने आराखड्यास अलीकडील मान्यता दिल्याचा संदर्भ क्रमांक व दिनांक. | |
| ५. | एक. ज्यामध्ये प्रक्रियेच्या विविध टप्प्यांचे थोडक्यात वर्णन दिलेले असते तो उत्पादन प्रक्रियेचा एक फ्लो चार्ट. | |
| | दोन. वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची यादी, अर्धसिद्ध उत्पादने, उपभोग्य वस्तू, विषारी वायूंचे उत्सर्जन, त्यांचे प्रमाण, साठवणुकीच्या पद्धती, हाताळणी, तो भरणे (लोडिंग) व त्याची वाहतूक करणे, इत्यादीसह. | |
| | तीन. तयार उत्पादने, उप-उत्पादने, त्यांचे प्रमाण, साठवणुकीच्या पद्धती, हाताळणी, तो भरणे (लोडिंग) व त्याची वाहतूक करणे. | |
| | चार. संभाव्य धोके आणि ते नियंत्रित करण्याची किंवा दूर करण्याची पद्धत. | |
| | अ. शेवटच्या सुरक्षा परिनिरीक्षणाची तारीख (लागू असल्यास) | |
| | ब. साईटवरील आपत्कालीन आराखडा तयार केल्याची किंवा शेवटी अद्यावत केल्याची तारीख (लागू असल्यास) | |

<table>
<tr><td rowspan="3">६.</td><td>ज्या कालावधीसाठी परवान्याकरिता किंवा परवान्याचे नूतनीकरण करण्याकरिता अर्ज केला होता तो कालावधी (दहा वर्षांपेक्षा अधिक नसलेला)</td><td></td></tr>
<tr><td>भोगवटादार बदलाच्या बाबतीत - बदलाची तारीख</td><td></td></tr>
<tr><td>दुरुस्तीच्या बाबतीत - बदलाची तारीख</td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td>वर्षभरातील कोणत्याही एका दिवशी काम करीत असलेल्या कामगारांची कमाल संख्या.</td><td><table><tr><td>पुरुष</td><td>महिला</td><td>इतर</td><td>एकूण</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>८.</td><td>स्थापित ऊर्जा अश्वशक्तिमध्ये/ निर्माण केलेली ऊर्जा मेगावॅटमध्ये.</td><td></td></tr>
<tr><td rowspan="9">९.</td><td>भोगवटादाराचे पूर्ण नाव</td><td></td></tr>
<tr><td>पदनाम (संचालक/ भागीदार/ मालक/ केंद्र/ राज्य शासन किंवा स्थानिक संस्था यांच्या बाबतीत नियुक्त केलेली व्यक्ती)</td><td></td></tr>
<tr><td>निवासस्थानाचा पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>कायमचा पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>जन्मतारीख</td><td></td></tr>
<tr><td>राष्ट्रीयत्व</td><td></td></tr>
<tr><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>ई-मेल</td><td></td></tr>
<tr><td>भोगवटादाराची डिजिटल स्वाक्षरी</td><td></td></tr>
<tr><td rowspan="9">१०.</td><td>व्यवस्थापकाचे पूर्ण नाव</td><td></td></tr>
<tr><td>निवासस्थानाचा पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>कायमचा पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>जन्मतारीख</td><td></td></tr>
<tr><td>व्यवस्थापक म्हणून नियुक्त केल्याची तारीख</td><td></td></tr>
<tr><td>राष्ट्रीयत्व</td><td></td></tr>
<tr><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>ई-मेल</td><td></td></tr>
<tr><td>व्यवस्थापकाची डिजिटल स्वाक्षरी</td><td></td></tr>
<tr><td>११.</td><td colspan="2">आदेश क्रमांक-------,दिनांक -------याद्वारे ऑनलाइन स्वरूपात रुपये¤¤ इतके शुल्क प्रदान केले.</td></tr>
</table>

**स्पष्टीकरण.—**

१. "भोगवटादार" याचा अर्थ, संचालक, भागीदार, मालक; अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (न) नुसार केंद्र/राज्य शासनाच्या किंवा स्थानिक संस्थेच्या बाबतीत नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे.

२. "डिजिटल स्वाक्षरी याचा अर्थ, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ३ च्या तरतुदींनुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा प्रक्रियेद्वारे स्वाक्षरी करताना केलेले कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे अधिप्रमाणीकरण, असा आहे.".

**१९.** मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना ४ ऐवजी, पुढील नमुना दाखल करण्यात येईलः-

**"नमुना- ४**

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

महाराष्ट्र राज्य

(नियम ६, ६-अ व ८ पहा)

**कारखाना चालविण्याचा परवाना**

परवाना क्रमांकः

कायमस्वरूपी अनुक्रमांकः

संचालक/अपर/सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, --------------यांनी, मान्यता दिलेल्या आराखड्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सीमांच्या आत, कारखाना म्हणून वापर करण्यासाठी ------------- येथे स्थित असलेल्या ------------- म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागेंसाठी ------------- (भोगवटादाराचे नाव) यांना कारखाने अधिनियम, १९४८ आणि त्या अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, याद्वारे, संदर्भ क्रमांक --------------, दिनांक --------- अन्वये परवाना देण्यात येत आहे.

परवाना पुढील गोष्टींसाठी देण्यात येत आहेः

वर्षभरातील कोणत्याही एका दिवशी काम करीत असलेल्या कामगारांची कमाल संख्या -------.

स्थापित ऊर्जा अश्वशक्तिमध्ये/ निर्माण केलेली ऊर्जा मेगावॅटमध्ये -------------.

परवाना, _____ पासून ३१ डिसेंबर २०XX पर्यंत वैध आहे.

प्रदान केलेले शुल्क रुपये :

दिनांकः

मुख्य निरीक्षक/उपमुख्य निरीक्षक.".

**२०.** मुख्य नियमांस जोडलेला नमुना ५ वगळण्यात येईल.

**२१.** मुख्य नियमांस जोडलेला नमुना ७ नंतर, पुढील नमुना समाविष्ट करण्यात येईलः-

**"नमुना ७-अ**

(नियम १८-अ पहा)

**आरोग्य नोंदवही**

(धोकादायक कार्यांमध्ये व प्रक्रियांमध्ये किंवा जोखीमकारक प्रक्रियांमध्ये काम करीत असलेल्या कामगारांव्यतिरिक्त कारखान्यांमध्ये काम करीत असलेल्या अन्य व्यक्तींच्या बाबतीत)

कारखान्याचे नाव व पत्ताः

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेल्या व्यक्तीची मी वैयक्तिकरित्या तपासणी केली आहे.

| अ. क्र. | विभाग | कामगाराचे नाव | लिंग | वय (शेवटच्या जन्म-तारखेनुसार) | सध्याच्या कामाच्या नोकरीची नियुक्तीची तारीख | नोकरीचे किंवा व्यवसायाचे स्वरूप | वैद्यकीय तपासणीची तारीख | तपासणी करताना आढळून आलेली लक्षणे/ चिन्हे | कामगाराच्या आरोग्याची खात्री करण्यासाठी केलेली चाचणी | कामगारांच्या आरोग्याची स्थिती / रोग | अर्हतापात्र वैद्यकीय व्यवसायाची तारखेसह स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

दिनांकः

अर्हता पात्र वैद्यकीय व्यवसायाचे /प्रमाणित करणाऱ्या शल्यचिकित्सकाचे / वैद्यकीय अधिकाऱ्याचे
नाव व स्वाक्षरीः

नोंदणी क्रमांकः____________, ________पर्यंत वैध.

ठिकाणः ________ ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आय. ए. कुंदन,**
शासनाचे प्रधान सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,

dated the 3rd October, 2025.

*NOTIFICATION*

Factories Act, 1948.

No. FAC 2025/CR No. 117 (Part-1)/Labour-4.— In exercise of the powers conferred by section 41 read with sections 112 and 115 of the Factories Act, 1948 (63 of 1948), in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra is hereby makes the following rules further to amend the Maharashtra Factories Rules, 1963, the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 115 of the said Act, as follows, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Factories (Second Amendment) Rules, 2025.

**2.** In rule 3 of the Maharashtra Factories Rules, 1963 (hereinafter referred to as "the principal Rules"),-

(1) in sub-rule (1),-

(a) for the words and figure "made in Form 1" the words and figure "made electronically in Form 1" shall be substituted;

(b) in clause (b) the words " in duplicate" shall be deleted;

(2) in sub-rule (2) the words "one copy of" shall be deleted;

(3) in sub-rule (3),-

(a) for the words and figure "made in Form 1" the words and figure "made electronically in Form 1" shall be substituted;

(b) in clause (b) the word "duplicate" shall be deleted;

(4) in sub-rule (4) the words "one copy of" shall be deleted.

**3.** In rule 3-A of the principal Rules,-

(1) in sub-rule (1),-

(a) the words "and approved by him" shall be deleted;

(b) the Explanation (1) shall be deleted;

(2) for sub-rule (2) the following sub-rule shall be substituted, namely:-

"(2) In case of Factory other than hazardous Factory, the Occupier shall submit the certificate of Stability in Form 1A issued by a competent person to the Chief Inspector of Factory within twelve months from the issuance of License under rule 6A in respect of such factory, building that has been constructed, reconstructed or extended for any premises that has taken in use as a Factory or a part of Factory.".

**4.** In rule 5 of the principal Rules,-

(1) in sub-rule (1), the words "in triplicate" shall be deleted;

(2) in sub rule (2),-

(a) for the figures "2013" the figures "2026" shall be substituted.

(b) for the existing "SCHEDULE A" and "SCHEDULE B" the following SCHEDULES shall be substituted, namely:-

*"Schedule-A*

**All Factories (except Power Generating Stations) Maximum Number of persons to be employed on the day during the year**

| Quantity of H.P. Installed (Maximum H.P.) | Number of workers | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Up to 19 | From 20 to 50 | From 51to 150 | From 151 to 250 | From 251 to 500 | From 501 to 1,000 | From 1001 to 2,500 | From 2501 to 4,000 | Above 4000 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| Nil | 385 | 825 | 3850 | 5775 | 11550 | 23100 | 46200 | 69300 | 92400 |
| Upto 10 | 770 | 2475 | 7700 | 11550 | 17325 | 34650 | 69300 | 92400 | 115500 |
| Above 10 but not above 50 | 1155 | 4125 | 11550 | 17325 | 23100 | 46200 | 86625 | 105875 | 127050 |
| Above 50 but not above100 | 3080 | 5775 | 17325 | 23100 | 34650 | 57750 | 103950 | 115500 | 138600 |
| Above 100 but not above 500 | 6930 | 11550 | 34650 | 46200 | 57750 | 86625 | 115500 | 138600 | 161700 |
| Above 500 but not above 1000 | 13475 | 24750 | 46200 | 63525 | 75075 | 115500 | 138600 | 161700 | 184800 |
| Above 1000 but not above 2000 | 19250 | 31350 | 63525 | 75075 | 92400 | 127050 | 161700 | 184800 | 207900 |
| Above 2000 | 26950 | 54450 | 75075 | 92400 | 127050 | 161700 | 184800 | 207900 | 231000 |

*Schedule-B*

**Power Generating Stations**

| General Capacity in Megawatts | Numbers of workers | | | |
|---|---|---|---|---|
| | Upto 100 | From 101 to 500 | From 501 to 1,000 | Over 1,000 |
| | Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| Upto 20 M.W. | 4620 | 6930 | 11550 | 17325 |
| Over 20 M.W. and Upto 50 M.W. | 6545 | 10395 | 17325 | 23100 |
| Over 50 M.W. and Upto 100 M.W. | 9625 | 13475 | 23100 | 28875 |
| Over 100 M.W. and Upto 250 M.W. | 13475 | 17325 | 28875 | 34650 |
| Over 250 M.W. and Upto 500 M.W. | 17325 | 28875 | 34650 | 40425 |
| Over 500 M.W. and Upto 750 M.W. | 26950 | 28875 | 42570 | 46200 |
| Over 750 M.W. and Upto 1,000 M.W. | 26950 | 34650 | 46200 | 57750 |
| Over 1,000 M.W. | 30800 | 34650 | 57750 | 69300 |

(3) in sub rule (3), the figures "2013" wherever it occurs shall be substituted for the figures "2026".

(4) sub-rule (4) shall be deleted.".

**5.** In rule 6 of the principal Rules, in sub-rule (*1*) for the words and figure "licence in Form 4" the words and figure "licence electronically in Form 4" shall be substituted.

**6.** In rule 8 of the principal Rules, in sub-rule (*2*) for the words "renew the same" the words and figure "renew the same electronically in Form 4" shall be substituted.

**7.** Rule 11 of the principal Rules shall be deleted.

**8.** For rule 14 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely:-

**"14. Notice of occupation.**-The notice of occupation, along with supporting documents, shall be submitted in Form 1 electronically. The Deputy Chief Inspector after accepting the notice, shall issue a license electronically in the name of occupier for the remaining period of previously granted license.".

**9.** In rule 15 of the principal Rules, for the words and figure "in Form 5" the words and figure "in Form 1 electronically" shall be substituted.

**10.** For rule 18-A of the principal Rules the following rule shall be substituted, namely:-

**"18-A. Medical Examination of workers.-**

(1) Every occupier shall arrange to conduct medical examination of every worker, free of cost except workers covered under rules 73-V and 114, who has completed forty-five years of age annually;

(2) The medical examination shall be conducted by qualified medical practitioner or Certifying Surgeon appointed or authorised by the Government under section 10 or an institute of qualified medical practitioners or medical officer of Employees' State Insurance Corporation or medical officer of Employees' State Insurance Society.;

*Explanation*.- "Institute of qualified medical practitioners" means an organization having group of at least five qualified medical practitioners.

(3) The occupier shall send Form 7-A electronically to the Chief Inspector within fifteen days from the date of medical examination.".

**11.** In rule 73-W of the principal Rules,-

(1) in sub-rule (*1*),-

(a) in clause (*a*) for the figures "50", the figures "150" shall be substituted;

(b) in clause (*b*) for the figures and word "51 to 200", the figures and word "151 to 500" shall be substituted;

(c) in clause (*c*),-

(i) for the figures "200" the figures "500" shall be substituted;

(ii) in sub-clause (*i*) for the figures "500" the figures "1000" shall be substituted;

(*2*) In sub-rule (*2*) after the words "by the State Government" the words "or minimum three years' experience of medical examination of Industrial workers" shall be inserted.

**12.** After rule 73-ZC of the principal Rules, the following rule shall be inserted, namely:-

**"73-ZD. Mock Drill.-**

(1) The Occupier of every factory shall conduct a mock drill based on probable emergency scenario arising out of hazard in the factory at least once in six months.

(2) The dates and the scenario of the mock drill shall be informed to the Inspector within fifteen days from the date when the mock drill is conducted.".

**13.** In rule 79 of the principal Rules, in sub-rule (*1*), the proviso shall be deleted.

**14.** For rule 102-B of the principal Rules, the following rule substituted, namely:-

**"102-B.-** *Safety, security measures and safeguards to be provided to women workers working in factory between 7.00 p.m. to 6.00 a.m.*- The Occupier shall, for employment of women, in factory before 6.00 a.m. and beyond 7.00 p.m., ensure the following conditions, namely:-

(a) Adequate transportation facilities shall be provided to women workers to pick-up from her residence and drop to factory and *vice-versa.*

(b) The workplace including passage towards conveniences and facilities concerning toilets, washrooms, drinking water, changing room, entry and exit of women worker shall be well-lit.

(c) Minimum two women workers shall be present on duty at any work place.

(d) The women worker, who work in night shifts and regular shifts, shall have a meeting through their representatives with the Manager, once in eight weeks as grievance day and the Manager shall try to comply with grievances.

(e) Written consent of each woman worker for such work and for such period, shall be obtained and preserved for three years.

(f) All reasonably practicable measures shall be ensured for the safety and security of women worker including installation of CCTV surveillance with recording facilities for at least forty-five days."

**15.** Rule 102-C of the principal Rules shall be deleted.

**16.** In rule 114 of the principal Rules,-

(1) in Schedule II, in clause (3) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(2) in Schedule III, in clause (3) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(3) in Schedule IV, in clause (4) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(4) in Schedule VI, in clause (4) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(5) in Schedule VII, in clause (1) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(6) in Schedule VIII, in clause (10), for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(7) in Schedule X, in clause (2) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(8) Schedule-XIII shall be deleted;

(9) in Schedule XIV, in clause (2) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(10) in Schedule XV, in clause (4) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(11) in Schedule XVIII, in clause (9) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(12) in Schedule XX, in clause (6) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(13) in Schedule XXI, in clause (16) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(14) in Schedule XXII, in clause (9) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted;

(15) in Schedule XXVI, in clause (9) for the word "women" the words "pregnant women, lactating mothers" shall be substituted.

**17.** For rule 114-A, the following rule shall be substituted, namely:-

**"114-A.** *Additional safety measures for employment of women in dangerous operations under section 87.-*

(1) Every woman employed in manufacturing process wherein dust or fume or other impurity is given off, shall be provided with suitable respirator, nose mask, etc.

(2) No woman worker shall be engaged to work near the machinery in motion without wearing head cap, apron and suitable overcoat so as to avoid the risk of bodily injury from any moving part.

(3) The occupier carrying on dangerous operations shall disseminate the information to every woman worker in relation to dangers, physical and health hazards arising from the exposure, handling, transportation, storage and other processes involved therein and such information shall be in Marathi and in the language understood by every woman worker.

(4) No pregnant or lactating women worker shall be allowed or required to work in a factory involved in dangerous operations, where she is likely to be exposed to hazardous substances which are carcinogenic and teratogenic.

(5) Women shall be well trained on their job and rendered knowledge about the hazardous properties of the substances being handled, stored, manufactured, hazards present at their work place and measures to overcome with that.

(6) Women employed shall be provided with all necessary personal protective appliances at the work places where they are deployed.

(7) Women shall be trained and made aware about the means of escape in the event of fire, leakage, spillage of hazardous substances.

(8) The occupier shall ensure that the women are not allowed to expose to materials if any which may influence or affect their menstrual cycles, reproductive health or pregnancy.".

**18.** For Form 1 appended to the principal Rules, the following Form shall be substituted, namely:-

"FORM-1

(See rules 3,5,8, 14 and 15)

Application for permission to construct a new factory, to extend existing factory or take into use any building as a factory/Application for Registration and for Grant of license / Renewal of license /Amendment of license of a factory/Notice of occupation /Notice of change of manager

(*Mark ✓ which is applicable)

| | | |
|---|---|---|
| 1. | Full name of the factory | |
| | Address of factory | |
| | Location of the factory (latitude $^0$North and longitude $^0$East) | |
| | Telephone Number | |
| | E-Mail - Registered Office (if any) | |
| | E-Mail - Factory | |
| 2. | If already registered, month and year of registration | |
| 3. | License number, if granted | |
| 4. | Reference number and date of latest approval of the plans by the Chief Inspector. | |
| 5. | i. A flow chart of the manufacturing process supplemented by a brief description of the process in its various stages. | |
| | ii. list of the raw materials used, intermediate products, consumables, including emission of toxic gases, their quantities, methods of storage, handling, loading and transport etc. | |
| | iii. finished products by-products, their quantities, methods of storage, handling, loading and transport. | |
| | iv. likely hazards and the method to control or eliminate them. | |
| | a. Date of last safety audit (if applicable) | |
| | b. Date of preparation or last update of onsite emergency plan (if applicable) | |

<table>
<tr><td>6.</td><td>The period for which license or renewal of license is applied for (not exceeding ten years)</td><td></td></tr>
<tr><td></td><td>In case of occupier change –Date of change</td><td></td></tr>
<tr><td></td><td>In case of amendment Date of amendment</td><td></td></tr>
<tr><td>7.</td><td>Maximum number of workers to be employed on any one day during the year</td><td><table><tr><td>Male</td><td>Female</td><td>Other</td><td>Total</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>8.</td><td>Installed power in Horse Power<br>/ Power generation in Mega Watts</td><td></td></tr>
<tr><td>9.</td><td>Full name of Occupier</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Designation (Director/Partner / Proprietor/ Person Appointed in case of Central/State Government or Local Body)</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Residential Address</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Permanent Address</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Date of Birth</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Nationality</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Mobile No.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>E-mail</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Digital Signature of Occupier</td><td></td></tr>
<tr><td>10.</td><td>Full name of Manager</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Residential Address</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Permanent Address</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Date of Birth</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Date of appointment as a manager</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Nationality</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Mobile No.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>E-mail</td><td></td></tr>
<tr><td></td><td>Digital Signature of Manager</td><td></td></tr>
<tr><td>11.</td><td colspan="2">Amount of fees Rs.________ paid online vide order No. __________ dated _______________</td></tr>
</table>

*Explanations.-*

1. Occupier means Director, Partner, Proprietor; Person Appointed in case of Central/State Government or Local Body as per sub-section (*n*) of section 2 of the Act.

2. Digital Signature means authentication of any electronic record by subscriber by means of an electronic method or procedure in accordance with the provisions of section 3 of the Information Technology Act, 2000.".

**19.** For Form 4 appended to the principal Rules, the following Form shall be substituted, namely:-

"FORM - 4

Directorate of Industrial Safety and Health

Maharashtra State

(See rules 6, 6-A and 8)

License to work a factory

License No.

Permanent Serial Number :

License is hereby granted to

-------------- (Name of the Occupier)

For the premises known as ------------------------------------

situated at -------------------------------------------------------

for use as a factory within the limits specified in the plan approved by the Director/Additional/ Joint Director, Industrial Safety and Health, --------------

Reff Number ---------------- Date --------- subject to provisions of the Factories Act, 1948 and the Rules made thereunder.

The license is issued for:

Maximum Number of workers to be employed on any day during the Year -----------

Maximum installed power in H.P. / Power Generation in Mega Watts -------------

The license is valid from ____ to 31st December 20XX.

Fees paid Rs :

Date:

Chief Inspector/Deputy Chief Inspector".

**20.** Form 5 appended to the principal Rules shall be deleted.

**21.** After Form 7 appended to the principal Rules, the following Form shall be inserted, namely:-

"FORM 7-A

(See rule 18-A)

Health Register

(In respect of persons employed in factories except workers engaged in dangerous operations and processes or hazardous processes)

Name and address of the factory:

I certify that I examined the person mentioned above personally.

| Sr. No. | Depar-tment | Name of worker | Sex | Age (as on last birth-day) | Date of employment of present work | Nature of job or occupation | Date of medical examination | Symptoms/ Sign observed during examination | Test conducted to ascertain health of worker | health status of workers/ disease | Signature of qualified medical practitioner with date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | |

Date :

Name and Signature of qualified medical practitioner/ Certifying surgeon / Medical Officer :

Registration No.____________valid upto________

Place:".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. A. KUNDAN,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.